# शहाजहानचे व्यक्तिमत्त्व

**डॉ. सुजाता एच. गौरखेडे,**
इतिहास विभाग
उम्मे सलमा गर्ल्स महाविद्यालय,
नागपूर.

बादशहा शहाजहानचे व्यक्तिमत्व फारच आकर्षक होते. तो दिसायला पण सुंदर होता. तो उंच असून त्याचे शरीर धष्ठपुष्ट होते. त्याचे कपाळ विशाल होते. आणि नेत्र काळे असून चमकदार होते. त्याचा रंग सावळा होता. उजव्या कानपटीच्या केसाजवळ त्याला एक तीळ होता, आणि एक तीळ उजव्या पापणीच्यावर होता, आणि डोळ्याच्या खाली आणि नाकाच्यावर एक मस्सा पण होता. सरळपण वाकदार नासिका, उत्तम दंत पंक्ती गोड आवाज. लांब दाढी असून त्याच्यातील राजतेज स्पष्ट दिसत होते. शिवाय शहाजहानचे व्यक्तिमत्व राजशाही वस्त्रामध्ये अतिशय प्रभावी आणि महत्वपूर्ण असायचे, त्याचा व्यवहार खूप विनम्र व मधुर असायचा लहान्यातील लहान अधिकाऱ्यालापण कधी तू म्हणून बोलत नव्हता.[१]

डॉ. सक्सेना म्हणतात की, ''शहाजहानचा विशाल साम्राज्याचा मूळ आधार त्याची सुव्यवस्थित शासनव्यवस्था होती. तो या पृथ्वीवर ईश्वराचा प्रतिबिंब तसेच ईश्वराची प्रतिछाया मानला जायचा. त्याने आपल्या नावाचा संवत चालविला. नवीन नाणी त्याने चलनात आणल्या आणि दुसऱ्या बाजूने स्वतःचे नाव कोरले. शहाजहान निरंकूश असूनही तो पारंपरिक नियमांना व रितीरिवाजांना मानायचा. त्याला प्रजेच्या हिताची सदैव काळजी असायची.[२]

शहाजहानचा शासनकाळात फार प्रगती झाली. कारण तो स्वतः फार परिश्रमी, न्यायप्रिय आणि अत्यंत प्रतिभासंपन्न होता. विदेशी व युरोपीयन इतिहासकारानुसार त्याच्यात व्यक्तिगत दोष असले तरी एक योग्य प्रशासक आणि यशस्वी सेनानायक होता. बर्निअरचा मतानुसार शहाजहान शासनातील सूक्ष्मातून सूक्ष्म समस्येवर स्वतःच लक्ष देऊन ती सोडवायचा. त्याने अनेक सैनिक मोहिमेची रूपरेशा स्वतःच आखली. तो दंड देण्यास फारच कठोर होता. त्यात त्याने मुलगा औरंगजेबालापण क्षमा केली नाही. औरंगजेब दक्षिण भारतात सुभेदार असतांना औरंगजेबाला फार कठीण अनुशासनात व अंकुशात ठेवले.

शहाजहानला संगीत व नृत्याची पण फार आवड होती. स्वतः तो फार कमी मद्य प्राशन करायचा. जसा परवेजचा मृत्यू अती मद्य प्राशनाने झाला. तर जहांगीरने केवळ एक प्याला मद्याकरिता पूर्ण शासनच नूरजहानच्या हातात दिले. जर शहाजहान पण अती मद्य प्राशन करता तर त्याला कुणाचीच भिती नव्हती. पण त्याने मात्र स्वतःला संतुलित ठेवले. याशिवाय तो पत्नी निष्ठपण होता. जहांगीरच्या आग्रहामुळे त्याने अर्जूमंदबानोचा साक्षगंधांनातर एक विवाह केला. तर स्वच्छेने लग्न केलेल्या अर्जूमंदबानोवरतो खूप प्रेम करायचा. मात्र दक्षिणेत असतांना राजकीय हेतूने त्याने तिसरे लग्न केले. इतर बादशहाप्रमाणे तो अनेक पत्नी तसेच दासीपण ठेऊ शकला असता. पण त्याने ठेवल्या नाहीत.[३] शहाजहानचा स्वभाव हा क्षमाशील होता. गैरसमजुतीमुळे झालेल्या गुन्हयांना त्याने राजगादीवर येताच माफ केले. तो न्यायामध्ये श्रीमंत—गरीब

भेद करीत नसे. त्याचे अक्षरपण खूप सुंदर होते. अनेकदा राजकुमार व मोठ्या अमीरांना तो आपल्याच हातांनी फरमान (आदेश) लिहायचा. अशाप्रकारे काही वेळ ईश्वरासोबत तर काही बादशाही कार्यात तर काही आराम व सैर–शिकारीमध्ये वेळ घालवित असे.[४]

विंसेन्ट स्मिथचे मत आहे की, तो एक विलासी शासक होता. त्याच्यामध्ये सैनिकी कुशलता नव्हती आणि शासनाविषयी योग्यतापण नव्हती. त्याचे सैनिक संघटन कमजोर व कमकुवत होते. म्हणून शासनव्यवस्था दुर्बल होती. तर न्यायव्यवस्था बर्बरतापूर्ण होती. त्याच्या हृदयात दुसऱ्यांप्रती आदर–सन्मान आणि दयाची भावना नव्हती.[५] त्याने राजगादी प्राप्तीकरिता आपल्या भावांचे आणि पुतण्याचे रक्त सांडविले आणि आपल्या शत्रूंशी अत्यंत कठोर व्यवहारपण केला. पण राज्य असे असते की, त्याच्या प्राप्तीकरिता मनुष्य अत्यंत घृणित गुन्हा करतो. खरं तर जगाचा इतिहास अशा अनेक उदाहरणांनी भरलेला आहे. त्याला शहाजहानही अपवाद नव्हता. परंतु तो खरंच अत्यंत कठोर व रक्तपिपासू होता. हे पूर्णत: बरोबर नाही. राजगादीवर बसताच त्याने सर्व मित्र व कुटूंबीय आणि मुख्यत: प्रजेशी दया, सहानुभुती व न्यायपूर्णच वागला. त्याने त्याच्याविरुद्ध कट करणाऱ्या नूरजहानलापण माफ केले. वास्ताविक पाहता नूरजहानचा कटकारस्थानामुळे व जहांगीरच्या स्थिरतेमुळे तो बेभान झाला होता व संशयीत होऊन त्याने जे कुकृत्य केले ते खरोखरंच अत्यंत घृणास्पद होते. शहाजहान आपल्या न्यायप्रियतेकरिता प्रसिद्ध होता. तो मोठ्यामोठ्या सरदारांना व अधिकाऱ्यांना पण दंड करायचा. त्याला आपल्या मुला–मुली व पत्नीबदद्ल फार स्नेह होते. तो प्रजेला कष्टातून दूर करण्यास सदैव तत्पर असायचा. दक्षिण व गुजरातच्या दुष्काळात मदत म्हणून त्याने प्रचंड धन खर्च केले. तो बाबर आणि अकबराप्रमाणे महान योद्धा नसला, तरी मात्र निश्चित त्याच्यात सैनिक कौशल्य तर होते. कारण मेवाड आणि दक्षिणेतील विजयाचे श्रेय त्याचेच होते. त्याने शासनकार्यात स्वत: रुची ठेऊन व राज्य कर्मचाऱ्यांच्या कामाचे सर्तकतेने निरीक्षण करून शासनव्यवस्था उत्तम चालविली.

शहाजहानचा प्रसिद्ध दिवान सादूल्ला खान खूप योग्य आणि कर्तव्य परायण अधिकारी होता. तो म्हणायचा जो दिवान प्रजेशी न्याय करीत नाही तो एका राक्षसाप्रमाणे असतो. जेव्हा त्याने अन्यायी व लाचखोर अधिकाऱ्यांना (प्रांतीय सुभेदारांपर्यंत) प्रजेद्वारा तक्रार केल्याने बरखास्त केले. त्यावेळी व्यापार, उधोगधंदे तसेच शेतीत प्रगती झाली. त्याने जरी इमारते दरबारी ठाटबाटात पैसा पाण्यासारखा खर्च केला. तरीही त्याच्या राज्यातील खजिना भरलाच होता. त्याचे प्रमाण कुठेच मिळत नाही की त्याने आपला खर्च प्रजेकडून अन्यायपूर्वक असा कर वसूल करून केला. म्हणून शहाजहानच्या काळात दक्षिणेत मध्य आशिया व कंधारमध्ये सतत युद्ध चालले तरीही साम्राज्याची आर्थिक दशा बिघडली नाही. टेवरनिअरने स्वत: बघितलेले दृश्य सांगितले की, ''शहाजहान हा असा शासक होता जसा एखादया कुटुंबातील मुलांचा पिता, ना की प्रजेचा राजा'' एलफिस्टनने म्हटले की, ''शहाजहानचा काळ हा भारताचा इतिहासातील सर्वात अधिक समृद्धशाली व गौरवशाली युग होते.''[६] आणि यात संशय नाही की, तो खूप महत्वकांक्षी होता व युद्धात अपार धन खर्च केले. मात्र त्याने प्रजेला आर्थिक दृष्ट्या शोशित केले नाही. प्रजा साधारणत: सुखीच होती. खफीखानाने अकबराला महान विजेता व व्यवस्थापक तर शहाजहानला एक महान शासक म्हटले आहे.

मुघल वंशाच्या सात पिढीनुसार अतिशय परिश्रमातून बनविलेले वैभवशाली साम्राज्य हे केवळ इतिहास जमा आहे. तर शहाजहानद्वारे कार्यान्वित भव्य इमारती आजपण लोकांना व कलाप्रेमीना फार आकर्षित करतात. त्यामुळेच भारताने संपूर्ण जगात स्थान निर्माण केले आहे. त्याकरिता केवळ ताजमहलच

पुरेसा आहे. जे त्याने अतिप्रिय पत्नी 'अर्जुमंदबानो बेगम' च्या मृत्यूनंतर एक अविस्मरणीय आठवणीचे प्रतिक म्हणून 'ताजमहल' बनविला.[७] या संपूर्ण जगाच्या कोणत्याही प्रेमीने आपल्या प्रेमिकेकरिता तिच्या अमरत्वाकरिता असा यशस्वी प्रयत्न केला नाही जसा शहाजहाने केला. ताजमहाल जगाचे स्मारक आहे. हे ताजमहल कुण्या एका व्यक्तीचे नाही तर कुण्या एका राष्ट्राची संपत्ती नाही ते तर संपूर्ण जगाचे आहे.

शहाजहानची कला अभिरुची केवळ स्थापत्यकलापर्यंतच नसून कलेचा सर्वच श्रेत्रात होती. म्हणूनच त्याचा काळाला सुर्वणकाळ म्हटल्या जाते. त्यावेळी दक्षिणेतील वातावरण भौगोलिक परिस्थिती, तेथील पर्वतरांगा, दऱ्याखोऱ्या ही सर्व परिस्थिती तेथील मुघल सैन्यांना आणि सरदारांना प्रतिकूल होती. ते सर्व सरदार दक्षिणेत जाण्यास टाळायचे युद्ध तर कठीणच होते. कारण तिथे महत्वपूर्ण होते मलिक अंबर व मराठ्यांची गानिमीकावा पद्धती.[८] मात्र, या सर्व बिकट प्रसंगावरच मात नव्हे. तर संपूर्ण दक्षिण प्रांतावर आपले वर्चस्व निर्माण करण्यास दृढनिश्चियी असणारा एकमेव मुघल बादशहा हा शहाजहानच होता. त्याने प्रथम अहमदनगरच्या निजामशाहीचे पूर्णत: पतन केले. विजापुरच्या आदिलशहाला आपले प्रभुत्व मान्य करण्यास नतमस्तक केले. आणि तो त्यांचा आत्मसमर्पणावरच संतुष्ट राहला. राजकुमार औरंगजेबाने वांरवार दक्षिणेला नष्ट करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण दूरदृष्टी व अनुभव असलेल्या शहाजहानने असे होऊ दिले नाही. जर शहाजहानने एकदा तरी संकल्प केला असता की, दक्षिणी राज्य पूर्णत: नष्ट करायचे आहे तर नक्कीच त्याला यश मिळाले असते. खरंतर दक्षिणेकडे शहाजहानचा पाहण्याचा दृष्टीकोन प्रारंभी वेगळाच होता. पण त्याचा शासनकाळाच्या शेवटच्या टप्प्यात मात्र त्याचा मुख्य उद्देश केवळ धनप्राप्ती एवढाच होता. जेणेकरून इराणच्या शहाकडून तीनदा अपयशी झाल्यानंतर राजकीय डाग पुसण्याकरिताच दक्षिणीनितीचे धोरण राबविले. व तेथून इरानच्या शहाचा प्रभाव पूर्णत: संपविला, असे शहाजहानचे दृढसंकल्प, दृढनिश्चयी असलेले व्यक्तिमत्व होते.

शहाजहानने केवळ निजामश्शाहीचे पतन केले. विजापुर आणि गोवळकोंडा याला केवळ खंडणी घेऊन मुक्त केले. कारण त्याचा आजोबा अकबराद्वारे सुरु केलेले कार्य पूर्ण करणे, अहमदनगर राज्याला अनियंत्रित सोडणे मूर्खपणाचे राहिले असते. याचकाळात विजापूरवर अनेकदा आक्रमण झाले. पण यश मिळाले नाही. या अनुभवावरूनच शहाजहाने साम्राज्यविस्तार निती थांबविली. पण प्रश्न असा पडतो की, राजकुमार औरंगजेबाने दक्षिणेतील दुसऱ्या सुभेदारीच्या कार्यकाळात विजापूर व गोवळकोंडा याला फार घाबरवून त्रस्त केले. जर त्याला सुट दिली असती तर त्याने या राज्याला नष्ट केले असते. पण शहाजहानने आपल्या बुद्धीचातुर्याने आणि दूरदृष्टीने हे जाणले की, त्यामुळे औरंगजेबाच्या साधनांमध्ये व प्रतिष्ठेत वाढ होईल ज्यामुळे दरबारात गटाचे संतुलन बिघडेल आणि पुढे जे कष्ट व दु:ख बादशहा शहाजहानला भोगावे लागले. ते त्याला त्या आधिच भोगावे लागले असते. त्याची निर्णयक्षमता व कर्तृत्वदक्षता यामुळेच त्याने अत्यंत कठीण अशा दक्षिण नितीमध्ये यश मिळवून त्याची उद्देश्यपूर्ती सार्थक केली.

मनूचे कथन आहे की, शहाजहान स्वत: मद्य घेत नव्हता. पण त्याने यात कोणताच सुधार केला नाही. प्रेसीडेन्ट फ्रेमलिनने आपल्या २९ डिसें १६४० ची पत्रात कंपनीला लिहिले की, ''आता बादशहा एक उत्तम व्यक्ती होत आहे. कारण त्याने ३ ते ४ महिण्यापूर्वीच आपल्या प्रांतपतीला आदेश दिला होता की, आम्हाला अंगुरी दारु एकतर इंग्रजांकडून किंवा पोर्तुगीजांकडून पाठवा म्हणून आम्ही कनारी मदिरा व अलोन्द या दोन पेट्या कुलीकडून २० घोडेस्वारांच्या संरक्षणात काश्मीरला पाठविल्या. आम्ही आशा करतो की लवकरच मदिरा रूचकर आहे की नाही ते कळेल. जर रुचकर निघाली तर आम्हाला पुढे पाठविण्याचा

आदेशाचे पालन करावे लागेल. या दोन्ही युरोपीयन प्रवासांच्या मतावरून जरी शहाजहानचा मद्यविषयी निष्कर्ष काढणे कठीण जाते. पण एवढे मात्र निश्चितच लक्षात येते की, त्याने सुरूवातीला स्वत:च्या २४ व्या वाढदिवसाचा निमित्त वडील जहांगीरंचा आग्रहावरून पहिल्यांदा मद्यप्राशन केले होते.[९] मात्र ते पुढे सोडले पण कारण बिकट परिस्थितीला तोंड देण्याचे धाडस त्याने पुर्वजांकडूनच म्हणजे तैमूर व बाबरकडून घेतले. शहाजहानने दारूचे भांडे व प्याले पूर्णत: नष्ट केले. जेणेकरून कुणीही मद्य घेऊ नये. कारण ते लक्ष्य गाठण्यास बाधक होते. तो कार्यक्षम जिद्दी व महत्वाकांक्षी व दूरदृष्टीकोन असणारा बुद्धीवान बादशहा होता. त्यामुळेच त्याने मद्य प्राशनात व कुठल्याच व्यसनात मग्न न राहता केवळ आपल्या उद्देशांना कार्यान्वित करण्यातच वेळ दिला असेल असेच लक्षात येते.

मात्र शहाजहानचा व्यक्तिमत्वाविषयी अनेक विदेशी व भारतीय इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. त्यावरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

**१. राजकीय स्थिती : —**

डॉ आशीर्वादीलाल श्रीवास्तव म्हणतात. ‘‘पैसा मिळविण्याच्या छंदामुळे त्याने प्रजेवर कराचा बोजा वाढविला आणि त्यामुळे प्रजेचे दु:ख वाढले.’’ मात्र ट्रॅव्हनिअर म्हणतो की, ‘‘एखादा पिता जसा आपल्या कुटुंबाची आणि मुलाबाळाची काळजी घेतो तसा शहाजहान आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी झटत असे.’’ त्याचा म्हणण्याप्रमाणे रस्ते सुरक्षित होते. प्रवाशांना चोर व लुटारुंचा त्रास होवू नये म्हणून सरकारने बंदोबस्त केला होता. त्याशिवाय प्रजेचा हितासाठी बादशहाचे अधिकाऱ्यानां आदेश असत. त्याने प्रजेकरिता दुष्काळ निवारणार्थ अनेक उपाय योजले. फीरोत तुघलकाने बनविलेली नहरे शिहाद मातीत दबली होती. त्याला बाहेर काढून ६० मैल पुढे वाढविली व त्याचे नाव नहरे—बिहिश्त ठेवले. खफी खानने म्हटले की, तैमुर वंशात शासन संघटनेत काय उत्पन्न—प्रगती करणे व अधिकारी तसेच सैनिकांची पारख करण्यात शहाजहानचा बरोबरीचा कोणीच झाला नाही. शेतकऱ्यांची सुरक्षा व काळजी घेतल्या गेली. अनेक भ्रष्टाचारी सुभेदारांना प्रजेच्या तक्रारीवरुन निलंबीत केले. तो ‘‘अत्याचारी तहसीलदारांना कठोर दंड दयायचा पण त्यांना क्षमा करायचा.[१०] त्याच्या शासनकाळात पूर्ण शांती होती. ताजमहाल किंवा इतर बांधकाम करतांना श्रमिकांना भरपूर मजुरी दिली. शेतीला पाणी पुरवठयाच्या सोयी केल्या. यावरून हेच स्पष्ट होते की, शहाजहानच्या काळातील राजकीय स्थिती अत्यंत दयनीय न राहता प्रजेचा हिताची व सुखसोयीची होती.

**२. आर्थिक स्थिती :—**

व्ही.ए.स्मिथ म्हणतात, ‘‘आधुनिक इतिहासकारांनी विशेषत: एल्फिस्टनने शहाजहानचे अमर्याद अनुकूल बाब रेखाटली आहे. त्यांचे दरबारी वैभव, संपत्ती, साम्राज्य कारकीर्दीतील तुलनात्मक शांतता आणि ताजसारख्या उत्कृष्ट स्थापत्याचे विलक्षण सौंदर्यामुळे चरित्रकारांचे डोळे दिपवून टाकले. मात्र त्यांनी दुर्गूणांकडे डोळेझाक करून सद्‌गुण अतिशयोक्तीपूर्ण रीतीने प्रतिपादन केले. बादशहा व त्याचा दरबार जेवढा समृद्ध व सुखी दिसत होता. तेवढाच सामान्य गरीब वर्ग दरिद्री व दु:खी होता. एडवर्डस आणि गॅरेट म्हणतात, ‘‘वरवर शांतता, समृद्धी, वैभव दिसत असले तरी शहाजहानच्या कारकीर्दीने साम्राज्याची व त्याच्या अर्थव्यवस्थेची मृत्यूघंटा वाजविली. शहाजहानने आपला बेसुमार नोकरवर्ग व अविस्मरणीय स्थापत्य यांचा खर्च भागविण्यासाठी ज्यांच्यावर साम्राज्य टिकून होते अशा शेतकरी व व्यावसायिक सामान्य समाजावर कराचे दु:सह ओझे लादले.’’[११]

अनेक इतिहासकारांनी आपली मते व्यक्त केले की, अंतर्गत शांतता खालसा व इतर जमिनीतील भरपूर पिके आणि देशीकृविदेशी व्यापारांची भरभराट यामुळे शहाजहानच्या वेळी मुघल साम्राज्याचे वैभव व समृध्दी हे कळसाला पोहचली होती. तसेच याच काळात विद्या, वाङ्मय, कला आणि स्थापत्य यांची नेत्रदिपक प्रगती झाली होती.

**३. धार्मिक स्थिती :—**

डॉ. आशीर्वादीलाल श्रीवास्तव म्हणतात, 'शहाजहानच्या कारकीर्दीत प्रतिगामी प्रवृत्तीची बीजे पेरली गेली. परिणामी ती त्याच्या वंशाचा पतनाची व साम्रज्याच्या विनाशाची प्रमुख कारणे बनली. व्हिन्सेन्ट स्मिथ म्हणतात ''पुत्रबंधू पिता आणि विधूर या नात्याने शहाजहान मध्ये व्यक्तिगत उणिवा होत्याच. शिवाय राज्यकारभाराच्या बाबतीत तो कृर, विश्वासघातकी आणि तत्वहीन होता.[१२] ''त्याने अनेक हिंदू मंदिरे ध्वस्त केली. अनेक हिंदुना जबरदस्तीने मुस्लीम बनवीले असेही अनेक इतिहासकारांनी लिहिले आहे. शहाजहानच्या हातून काही असहिष्णूतापूर्ण कृत्ये घडली असली तरी तो सहिष्णू बादशहा होता. त्याचे अनेक प्रधानमंत्री सादुल्लाखान हा मुळचा हिंदु होता. बादशहाचा पुत्र दाराशिकोह अकबरासारखा उदार व सहिष्णू होता. याशिवाय त्याने अनेक हिंदुना मुस्लीम बनविले आणि हिंदु मंदिरे उध्वस्त केली. यावर एस.आर.शर्मा यांनी मुगलकालीन भारत' यामध्ये लिहिले आहे की, हिंदु मुले मुस्लीम मुलींना पळवून नेवून त्यांच्याशी विवाह करीत आणि त्यांना हिंदु धर्म स्विकारून त्यांचा पोषाख राहणीमान हिंदु संस्कृतीसारखा करीत. जेव्हा याची माहिती शहाजहानला झाली त्यावेळी त्याने त्या मुलीना परत आणून त्या हिंदु मुलाना मुस्लीम बनविले. तो कटट्र सून्नी पंथीय मुस्लीम होता. त्यामुळे आपल्या रागाला शांत करण्यास त्याने अनेक हिंदु मंदिरे उध्वस्त केली. पण पुढे विनम्र झाला त्याची धर्मान्धिता संपुष्टात येवून त्यांने मंदिरे आणि धर्माविषयी कोणताच हस्तक्षेप केला नाही. पुढे त्याचा शासनकाळ हा धार्मिक अत्याचार, तात्सुब आणि असहिष्णूतेचे युग राहले नाही.[१३]

अशाप्रकारे शहाजहानची धार्मिक स्थिती अतिशय असहिष्णू होती हे मत मान्य होत नाही.

एल्फिस्टन म्हणतात, 'शहाजहानची कारर्कीद कदाचित भारतातील सर्वात समृध्द कारर्कीद असावी अनेक विदेशी युद्धात गुंतलेला असला तरी त्याच्या साम्राज्यात जवळजवळ अखंड शांतता असून प्रशासन सुद्धा चांगले होते.[१४]

श्रीराम शर्मा म्हणतात ' शहाजहानच्या काळात वैभव आणि समृद्धी प्रदर्शित करणाऱ्या बऱ्याच गोष्टीचे दर्शन घडते म्हणून त्याच्या कारर्कीदीला मुघल साम्रज्याचे सुर्वणयुग म्हणणे योग्य होईल.[१५]

श्री. आर. पी. त्रिपाठी म्हणतात, 'शहाजहानची कारर्कीद समृद्ध होती मयुरासन, ताजमहाल, मोतीमशीद, शहाजहानाबाद व तेथिल किल्ला वगैर आजही मुघल साम्रज्याच्या महानतेची व वैभवाची साक्ष देतात.[१६]

बनारसी प्रसाद सक्सेना म्हणतात, त्याच्या कारर्कीदीत मुघल साम्राज्याचे वैभव व समृद्धीचे शिखर गाठले होते.[१७]

श्रीराम शर्मा यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी शहाजहानच्या काळाची आधुनिक काळाचा चष्म्यातून पक्षपाती पाहणी केली म्हणून त्यांची मते पक्षपात व पुर्वग्रहदूषित आहेत. मात्र डॉ आशीर्वादीलाल श्रीवास्तव सारखे भारतीय इतिहासकारसुध्दा शहाजहानच्या काळाला सुर्वणयुग व वैभवशाली मानत नाही हे कसे? याचे असेच की आपले दोश झाकण्यासाठी मुसलमानांचे सगळेच वाईट असे म्हणणारा एक वर्ग भारतात आहे.

त्यामुळे स्वत:वर पक्षपाताचा आरोप येऊ न देता. संधी सापडेल तेथे मुसलमानांवर हल्ला चढविणारा इतिहासकारांचा एक गट आहे. त्या गटात डॉ आशीर्वादीलाल श्रीवास्तव यांचाही समावेश होतो. त्याचे म्हणणे होते. की, शहाजहानने डोईजड कर लादले त्याचे खंडन अशाप्रकारे

१. जरी शहाजहानने प्रजेवर डोईजड कर लादले तरी ते ते देण्याची ऐपत (पैसे) मात्र प्रजेजवळ होती. कारण शहाजहानच्या बांधकाम वगैरेमुळे हजारो लोंकाना रोजगार मिळाला होता, नाही तर मुहम्मद तुघलकाप्रमाणे शहाजहानच्या विरोधात बंडे झाली असती. शेतकरी व सामान्य गरीब वर्ग हा केव्हा सुखी होता? ना प्राचीन काळात ना मध्ययुगीन काळात ना आधूनिक काळात पांढरपेशा नोकरवर्ग व राज्यकर्ते यांनी त्यांचा खऱ्या प्रगतीचे प्रयत्न क्वचितच केलेले दिसून येते.

२. मुघल सैन्याचे पतन :— शहाजहानचे सैन्य आळशी, विलासी बनले याला त्यांची समृद्धीच कारणीभूत ठरते.

३. मराठयांचा उदय होणे :— मुघल साम्राज्य काबीज करून अटकेवर झेंडे फडकविणाऱ्या मराठयांचा उदय शहाजहानच्या कारर्कीदीत झाला. खंर तर शहाजहानमुळे मराठयांचा उदय झालेला नसून त्याला इतर कारणे पण जबाबदार आहेत. उलट शहाजहानने शहाजी भोसलेचा पराभव करून मराठयांच्या आशा आकांक्षा धुळीस मिळविल्या होत्या. मात्र मराठयांना शिवाजीसारखा अष्टपैलू नेता लाभल्यानेच मराठे प्रबळ बनले होते.[१८]

यावरून लक्षात येते की, शहाजहानच्या कारर्कीदीत काही दोष व उणिवा असल्या तरी एकूण मुघलकाळाचा उदा. इ.स. १५२६ ते १८५७ पर्यंत विचार केला असता. शहाजहानचा काळ इ.स.१६२८ ते १६५८ हा सर्वात समृध्द वैभवशाली आणि शांततापूर्ण होता असे दिसून येईल. शहाजहानवर प्रखर टीका करणारे व्ही.ए.स्मिथ सुद्धा म्हणतात की, त्यांचे मुमताजवरील पराकाष्टेचे प्रेम ही त्याच्या व्यक्तिमत्वातील सर्वात उज्जवल बाजू सांगता येईल. पण पित्याशी आणि पुत्राशी मात्र त्याचे विचार जुळले नाही. तसेच शहाजहानने मिळविलेले विजय त्यास उत्तम सैनिक व सेनापती सिध्द करतात. मात्र 'शहाजहान कुशल सेनापती नव्हता हे स्मिथचे मत विचित्र वाटते. बनारसी प्रसाद सक्सेना म्हणतात की, शहाजहानची कारर्कीद परस्परविरोध प्रदर्शित करते. एका बाजूने तेजस्विता व महानता यांचे विलक्षण प्रदर्शन आहे. तर दुसऱ्या बाजूने पतनाची चिन्हे स्पष्ट दृष्टीस पडतात.[१९]

**संदर्भ ग्रंथ सूची** :—

१. गर्ग दामोदरलाल, 'शहाजहानामा' पृ.क्र.२६१.
२. डॉ. भार्गव मोतीलाल, 'मुगलकालीन भारत का इतिहास' पृ.क्र. २३०,२३१.
३. कित्ता पृ.क्र . २३१.
४. राणावत रघूविरसिंह मनोहरसिह, 'शहाजहानामा' मुंशीदेवीकृत, पृ.क्र. ३१५,३१६.
५. इलियट आणि डाऊसन 'ऑक्सफोर्ड, हिस्ट्री ऑफ इंडिया' पृ.क्र. ४१५.
६. — कित्ता — पृ.क्र. ५२५.
७. बेगले आणि देसाई, 'ताजमहाल' पृ.क्र . ४२,४४.
८. डॉ राधेश्याम, 'लाइफ ॲण्ड टाइम्स ऑफ मलिक अंबर' पृ.क्र . ११०,११२.

९. रॉजर्स आणि बेव्हरीज 'जहांगीरनामा' भाग १ प पृ.क्र . २०६.
१०.त्रिपाठी आर. पी. 'मुगल साम्रज्य का उत्थान और पतन पृ. ३८९.
११.देशमुख मा. मा. 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' पृ.१७४.
१२.इलियट एण्ड डाऊसन, 'हिस्ट्री ऑफ इंडिया' पृ ४१५.
१३.त्रिपाठी आर. पी. 'मुगल साम्रज्य का उत्थान और पतन पृ ३९०.
१४.इलियट एण्ड डाऊसन, 'हिस्ट्री ऑफ इंडिया' पृ ५२५.
१५.देशमुख मा. मा. 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' पृ.१७५.
१६.त्रिपाठी आर. पी. 'मुगल साम्रज्य का उत्थान और पतन पृ. ५०१.
१७.सक्सेना बनारसीप्रसाद, 'मध्ययुगीन भारताचा इतिहास पृ. ३५२.
१८.देशमुख मा. मा. 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' पृ.क्र . १७७.
१९.सक्सेना बनारसीप्रसाद, हिस्ट्री ऑफ शहाजहान ऑफ दिल्ली', पृ.क्र . २९६.